नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

# दैनिक यश सिद्धि न्यूज

संपादक : कमलाकर सोनकांबळे

YASH SIDDHI NEWS

वर्ष - ४ थे Year - 4rd | अंक - १२७ Issue - 127 | वार - शुक्रवार दि. २ ऑक्टोबर २०२६ Blow- Friday Date 2 OCTOBER 2026 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये Amout - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

# दिवेआगरच्या समुद्रात आठ विद्यार्थ्यांचा बुडून मृत्यू

## रायगडमध्ये मोठी दुर्घटना; सर्व मृत विद्यार्थी पुण्यातील आळंदी येथील

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

रायगड : रायगडमध्ये मोठी दुर्घटना घडली आहे. दिवेआगरच्या समुद्रात आठ विद्यार्थ्यांचा बुडून मृत्यू झाला आहे. एका खासगी क्लासची सहल दिवेआगर येथे आली होती. सर्व विद्यार्थी हे पुणे जिल्ह्यातील आळंदी येथील एका खासगी क्लासचे विद्यार्थी होते. हे सर्व विद्यार्थी एकत्र सहलीला आले होते. या दरम्यान पाण्याचा अंदाज न आल्याने ८ विद्यार्थ्यांचा मृत्यू झाला आहे. मिळालेल्या माहितीनुसार,सर्व विद्यार्थी विनर्स कॅडमी या क्लासचे विद्यार्थी होते. आठही विद्यार्थ्यांचा मृत्यू झाला आहे. हे सर्व विद्यार्थी इयत्ता अकरावी आणि बारावीचे होते. एकूण ४२ विद्यार्थी सहलीसाठी दिवेआगरच्या समुद्रकिनाऱ्यावर गेले होते. यामध्ये १७ मुली आणि २५ मुलांचा समावेश होता.

आठही विद्यार्थ्यांचे मृतदेह प्राथमिक आरोग्य केंद्रात नेण्यात आले आहे. तसेच इतर विद्यार्थी आणि शिक्षकदेखील याच आरोग्य केंद्रावर असल्याची माहिती आहे. विद्यार्थ्यांना पाण्याचा अंदाज न आल्याने ही दुर्दैवी घटना घडली. दरम्यान, त्यांना वाचवण्यासाठी तातडीने प्रयत्न करण्यात आले. सर्वांना शोधून समुद्रातून बाहेर काढण्यात आलं. यावेळी इतर विद्यार्थी, पोलीस आणि शिक्षकांनी या सर्व विद्यार्थ्यांना सीपीआर देण्याचा प्रयत्न केला. पण त्यांच्या प्रयत्नांना यश आले नाही. आठही विद्यार्थ्यांचा या घटनेत मृत्यू झाला.



या घटनेवर राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार रोहित पवार यांनी दु:ख व्यक्त केलं आहे. दिवेआगार इथं सहलीसाठी गेलेल्या आळंदी येथील खासगी क्लासच्या ८ विद्यार्थ्यांचा पोहण्यासाठी गेले असताना समुद्रात बुडून दुर्दैवी मृत्यू झाल्याचं वृत्त अत्यंत धक्कादायक आणि मन सुन्न करणारं आहे. या सर्व विद्यार्थ्यांना भावपूर्ण श्रद्धांजली! या दुःखातून सावरण्याची शक्ती त्यांच्या कुटुंबियांना मिळो, ही ईश्वरचरणी प्रार्थना! या कठीण प्रसंगी त्यांच्या कुटुंबियांप्रती माझ्या सहवेदना आहेत. मुळात ही घटना कशी घडली याचा सखोल तपास झाला पाहिजे, असं रोहित पवार म्हणाले आहेत.

स्थानिक आमदार महेंद्र दळवी यांनी या घटनेवर प्रतिक्रिया दिली आहे. घडलेली घटना ही दुर्दैवी आहे. तिथल्या स्थानिक प्रशासनाने काळजी घेणं गरजेचं होतं. गार्ड ठेवणं गरजेचं होतं. कारण त्या ठिकाणी वारंवार अशा घटना घडत आहेत. पर्यटकांना समुद्राचा अंदाज नसतो. त्यामुळे अशा दुर्घटना घडतात. ही दुखद घटना आहे. स्थानिक प्रशासनाने काळजी घेणं आवश्यक होतं. तिथे लाईफ गार्ड, गाईड करणारं कुणी नाही, असं दिसत आहे. बाहेरुन येणाऱ्या लोकांना समुद्राचा अंदाज नाही. समुद्राचा भरती-ओहोटीचा अंदाज घेणं ही काळाजी गरज आहे. म्हणून तिथे गार्ड असणं गरजेचं आहे. तिथल्या प्रशासनाने काळजी घेणं गरजेचं होतं. वारंवार अशा घटना घडत आहेत. कित्येक लोकांचा यामध्ये बळी जात आहे, अशी प्रतिक्रिया महेंद्र दळवी यांनी दिली.

दुर्दैवी घटनेत मृत्यू झालेल्या विद्यार्थींची नावे : १. यश किरण वानखेडे २. ऋसोहम तुकाराम भांडवलकर ३. ऋतन्मय दत्तात्रय वाहिले ४. ऋकौस्तुभ संदीप दौंड ५. ऋकैवल्य वासनकर ६. ऋराजवीर वहिले ७. ऋप्रणव बनसोडे ८. ऋसुमित अहिरे

## दुष्काळी २६५ तालुक्यांतील शेतकऱ्यांना मोठा दिलासा

# पीक कर्जाचे मध्यम मुदतीत पुनर्गठन आणि वसुलीला स्थगिती!

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



मुंबई : खरीप २०२६ हंगामात दुष्काळी परिस्थिती घोषित करण्यात आलेल्या राज्यातील २६५ तालुक्यांतील शेतकऱ्यांना राज्य शासनाने मोठा दिलासा दिला आहे. या दुष्काळी तालुक्यांमधील शेतकऱ्यांनी घेतलेल्या अल्पमुदत पीक कर्जाचे मध्यम मुदतीच्या कर्जात पुनर्गठन करण्यास मान्यता देण्यात आली असून, शेतीशी निगडित कर्जाच्या वसुलीलाही तात्काळ स्थगिती देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांनी यासंदर्भातील माहिती दिली आहे.

सवलती आणि निर्णयाची प्रमुख वैशिष्ट्ये:

**कर्ज पुनर्गठन:** ३१ मार्चपर्यंत विहित मुदतीत पीक कर्जाची परतफेड करू न शकणाऱ्या आणि आर्थिक अडचणीत आलेल्या शेतकऱ्यांच्या संमतीने खरीप हंगामातील अल्पमुदत पीक कर्जाचे मध्यम मुदतीच्या कर्जात पुनर्गठन केले जाईल. यामुळे शेतकऱ्यांना कर्ज फेडण्यासाठी अतिरिक्त मुदत मिळणार आहे.

**वसुलीस स्थगिती:** दुष्काळी घोषित करण्यात आलेल्या सर्व २६५ तालुक्यांमध्ये शेतीशी निगडित कर्जाच्या वसुलीवर स्थगिती असणार आहे.

कालावधी आणि पुढील तरतूद: पीक कर्जाच्या पुनर्गठनाची सर्व प्रक्रिया बँकांनी ३० एप्रिल २०२७ पर्यंत पूर्ण करण्याचे निर्देश शासन परिपत्रकात देण्यात आले आहेत. तसेच, पुनर्गठन झालेल्या पात्र शेतकऱ्यांना पुढील खरीप हंगामासाठी नवीन पीक कर्ज उपलब्ध करून देण्याच्या सूचनाही बँकांना करण्यात आल्या आहेत.

या निर्णयाची काटेकोर अंमलबजावणी करण्याची जबाबदारी सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था तसेच समन्वयक, राज्यस्तरीय बँकर्स समिती (बँक ऑफ महाराष्ट्र, शिवाजीनगर, पुणे) यांच्यावर सोपवण्यात आली आहे.

**कोणकोणत्या विभागांतील तालुके समाविष्ट?** या निर्णयाचा लाभ राज्यातील विविध विभागांतील २६५ दुष्काळी तालुक्यांमधील पात्र शेतकऱ्यांना मिळणार आहे:

**कोकण विभाग:** रायगड आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यातील प्रमुख तालुके.

**नाशिक विभाग:** नाशिक, धुळे, जळगाव, नंदुरबार आणि अहिल्यानगर जिल्ह्यातील एकूण ५० हून अधिक तालुके.

**पुणे विभाग:** पुणे, सोलापूर, सांगली, सातारा आणि कोल्हापूर जिल्ह्यातील दुष्काळग्रस्त तालुके.



छत्रपती संभाजीनगर विभाग: छत्रपती संभाजीनगर, जालना, बीड, लातूर, धाराशिव, नांदेड, परभणी आणि हिंगोली या संपूर्ण मराठवाड्यातील तालुके.

**अमरावती विभाग:** बुलढाणा, अमरावती, अकोला, वाशिम आणि यवतमाळ जिल्ह्यातील तालुके.

**नागपूर विभाग:** वर्धा, नागपूर, भंडारा, गोंदिया, चंद्रपूर आणि गडचिरोली जिल्ह्यातील पात्र तालुके.

नक्की ठरवून दिलेल्या कालमर्यादेत संबंधित यंत्रणांनी या निर्णयाची अंमलबजावणी करावी, अशा सक्त सूचना देण्यात आल्या असून यामुळे दुष्काळामुळे त्रस्त असलेल्या राज्यातील लाखो शेतकऱ्यांना दिलासा मिळणार आहे.

# जनजातीय क्षेत्राच्या विकासासाठी २५ हजार कोटींची तरतूद : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : संसदीय संकुल विकास परियोजनेअंतर्गत तयार होणाऱ्या कार्ययोजना राबविण्यास राज्य शासन तत्पर आहे. या योजनेच्या माध्यमातून जनजातीय क्षेत्राच्या विकासासाठी २५ हजार कोटींची तरतूद केली असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी गुरुवारी सांगितले.

सह्याद्री अतिथिगृह येथे आयोजित संसदीय संकुल विकास परियोजनेच्या उद्घाटन कार्यक्रमात मुख्यमंत्री फडणवीस बोलत होते. जनजातीय क्षेत्राच्या विकासासाठी परियोजनेच्या माध्यमातून गावातच रोजगारनिर्मिती करून स्थलांतर रोखण्यासह जनजातीय क्षेत्रातील नागरिकांचे जीवनमान उंचावून सामाजिक परिवर्तन घडविता येईल, अशी अपेक्षाही मुख्यमंत्र्यांनी व्यक्त केली.

मुख्यमंत्री म्हणाले, आदिवासी क्षेत्राचा विकास, नागरिकांचे जीवनमान उंचावणे, रोजगारनिर्मिती आणि स्थलांतर रोखणे ही परियोजनेची प्रमुख उद्दिष्टे आहेत. केंद्र आणि राज्य शासनाच्या जनजातीय क्षेत्रासाठी असलेल्या योजनांचे समायोजन करून एकाच गावाऐवजी गावांचा समूह तयार करीत एकात्मिक पद्धतीने विकास करणे आवश्यक आहे. नागरिकांच्या जीवनात उन्नती घडविणाऱ्या उपक्रमांचा त्यात समावेश असणार आहे. या परियोजनेची संकल्पना पाच ते सहा वर्षांपूर्वी मांडण्यात आली होती आणि आता तिची अंमलबजावणी होत आहे. नंदुरबार जिल्ह्यात परियोजनेचे चांगले परिणाम झाल्याचे अहवालातून दिसत असून शेती क्षेत्राला मोठ्या प्रमाणावर लाभ मिळत आहे. त्यामुळे नागरिकांच्या जीवनमानातही बदल घडत असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी नमूद केले. केंद्र शासनाने जनजातीय क्षेत्रासाठी तयार केलेल्या दोन योजनांमुळे या क्षेत्राच्या विकासाला गती मिळत आहे. शिक्षण, आरोग्य आणि रोजगार क्षेत्रातील योजनांची प्रभावी अंमलबजावणी केल्यास अपेक्षित परिणाम साधता येतील. योजनांचा लाभ खऱ्या लाभार्थ्यांपर्यंत पोहोचविण्यासह त्यांच्या अंमलबजावणीवर प्रभावी नियंत्रण ठेवणे आवश्यक असल्याचेही मुख्यमंत्री फडणवीस यांनी स्पष्ट केले.

यावेळी आदिवासी विकास मंत्री अशोक उईके, माजी केंद्रीय राज्यमंत्री डॉ. भारती पवार, आमदार रवींद्र चव्हाण व योगेश सागर, माजी खासदार हिना गावित, योजक संस्थेचे गजानन डांगे, संसदीय संकुल परियोजना संयोजक व्ही. सतीश आदी उपस्थित होते.

# फ्लायदुबई विमानात पायलटवर प्राणघातक हल्ला; युएईकडून दहशतवादी कोनाची शक्यता तपासण्यासाठी उच्चस्तरीय चौकशीचे आदेश

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

दुबई : दुबईहून तेल अवीवला जाणाऱ्या 'फ्लायदुबई'च्या विमानात सह-पायलटने मुख्य वैमानिकावर (पायलट-इन-कमांड) चाकूने प्राणघातक हल्ला करून विमान क्रॅश करण्याचा प्रयत्न केल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. या गंभीर घटनेची नोंद घेत संयुक्त अरब अमिरातीने (युएई) या प्रकरणाची सखोल चौकशी करण्याचे आदेश दिले असून, यामागे कोणताही दहशतवादी कट किंवा पूर्व नियोजित कट होता का, या कोनातूनही तपास केला जात आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, 'फ्लायदुबई'चे ऋज१०७३ हे विमान १७४ प्रवाशांना घेऊन जात असताना ही भयानक घटना घडली. उड्डाणादरम्यान अचानक सह-पायलटने मुख्य वैमानिकावर चाकूने वार केले, ज्यामुळे विमानाचे नियंत्रण सुटले आणि ते सुमारे १६,००० फूट खाली कोसळले. मात्र, विमानात उपस्थित असलेले भारतीय ळिश्रीं स्मित मच्छार यांनी कॉकपिटचा दरवाजा उघडल्याने प्रवाशांनी तातडीने सह-पायलटला पकडून बांधून ठेवले. त्यानंतर विमानात उपस्थित असलेल्या दुसऱ्या पायलटच्या जोडीने नियंत्रण मिळवून हे विमान सौदी अरेबियातील ताबुक विमानतळावर सुरक्षितपणे उतरवले आणि १७४ जणांचे प्राण वाचले.

या संपूर्ण प्रकरणावर 'युएई'च्या परराष्ट्र मंत्रालयाने अधिकृत निवेदन जारी केले आहे. या घटनेची पार्श्वभूमी आणि नेमकी कारणे शोधण्यासाठी अटॉर्नी-जनरल कौन्सिलर डॉ. हमद (पान २ वर..)

## दुष्काळी परिस्थिती पाहून ट्रिगर-वनमध्ये न आलेल्या तालुक्यांचाही समावेश करणार

**महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांची माहिती**

# दिवाळीपूर्वी शेतकऱ्यांना मदत देण्याचा सरकारचा प्रयत्न



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : दुष्काळी परिस्थितीमुळे अडचणीत आलेल्या शेतकऱ्यांना दिवाळीपूर्वी मदत मिळावी, यासाठी पंचनाम्यांची प्रक्रिया लवकर पूर्ण करण्याचा सरकारचा प्रयत्न आहे. प्रत्यक्ष दुष्काळी परिस्थिती असतानाही 'ट्रिगर-वन'मध्ये न आलेल्या सुमारे १५ ते १८ तालुक्यांचाही अचूक पंचनामे आणि आणेवारीच्या आधारे दुष्काळाच्या कक्षेत समावेश करण्यात येईल, अशी माहिती महसूल मंत्री तथा दुष्काळ निवारण मंत्रिमंडळ उपसमितीचे अध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी गुरुवारी दिली.

दुष्काळी परिस्थितीचा आढावा घेऊन शेतकऱ्यांना दिवाळीपूर्वी काहीतरी मदत त्यांच्या हातात मिळाली पाहिजे, अशी सरकारची भूमिका असून, कॅबिनेट उपसमितीनेही त्याबाबत शिफारस केली आहे, असे बावनकुळे यांनी सांगितले. विदर्भ, पश्चिम महाराष्ट्र आणि नंदुरबारमधूनही ट्रिगर-वनमध्ये न आलेल्या, मात्र प्रत्यक्ष दुष्काळी स्थिती असलेल्या तालुक्यांचा समावेश करण्याच्या मागण्या आल्या आहेत. त्यासाठी टप्प्याटप्प्याने सर्वेक्षण केले जाणार असून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याशी चर्चा करून पुढील निर्णय घेतला जाईल, असे त्यांनी स्पष्ट केले.

वर हिरवे दिसते, पण खाली काही नाही, अशी परिस्थिती अनेक ठिकाणी असल्याने ट्रिगर-वनमध्ये तालुका आला आहे की नाही, यावर दुष्काळाचे मूल्यमापन न करता प्रत्यक्ष स्थितीचा अचूक पंचनामा करणे आवश्यक आहे, असे बावनकुळे म्हणाले. पंचनामा करताना शेतकऱ्याची सही घेणे महत्त्वाचे असून, त्यामुळे प्रत्यक्ष परिस्थितीची नोंद होईल. आणेवारी निश्चित झाल्यानंतर दुष्काळातील मदतीचा लाभ शेतकऱ्यांना मिळू शकतो, असे त्यांनी सांगितले.

पंचनामे प्रत्यक्षात योग्य पद्धतीने होत आहेत की नाहीत, याची तपासणी करण्यासाठी बावनकुळे पुढील तीन दिवसांत सहा जिल्ह्यांना भेट देणार आहेत. संभाजीनगर-जालना, त्यानंतर अकोला-बुलढाणा आणि ४ ऑक्टोबरला धुळे-जळगाव येथे पाहणी केली जाणार आहे. पंचनाम्यासाठी नेमकी टीम क्षेत्रावर आहे का आणि प्रत्यक्ष परिस्थितीची योग्य नोंद होत आहे का, हे तपासणार असल्याचे त्यांनी सांगितले. महसूल, कृषी आणि ग्रामविकास या तीन विभागांकडून पंचनामे केले जात असून त्यावर तिन्ही विभागांच्या अधिकाऱ्यांच्या स्वाक्षऱ्या असतात. त्यामुळे तीनही विभागांनी समन्वयाने आणि अचूकपणे पंचनामे करणे आवश्यक असल्याचे बावनकुळे यांनी स्पष्ट केले.

शेतकऱ्यांची थट्टा करणाऱ्या अधिकाऱ्यावर कारवाई

मंत्री पाहणीसाठी येणार असल्याने बांधावर रॅम्प तयार करून शेतकऱ्यांच्या वरून उडी मारण्याच्या प्रकाराबाबत बावनकुळे यांनी नाराजी व्यक्त केली. अशा प्रकारे शेतकऱ्यांची थट्टा करणे योग्य नसून संबंधित अधिकाऱ्यावर कारवाई करण्यात येईल, असे त्यांनी सांगितले.

दुष्काळाच्या काळात प्रशासनाची यंत्रणा प्रत्यक्ष गावात उपलब्ध असणे आवश्यक आहे. गावातील यंत्रणा गावात, तालुक्याची यंत्रणा तालुक्यात आणि जिल्ह्याची यंत्रणा जिल्ह्यातच असली पाहिजे, तरच दुष्काळ निवारणाची कामे प्रभावीपणे करता येतील, असे बावनकुळे म्हणाले. सर्व जिल्हाधिकाऱ्यांनी सुट्ट्या रद्द केल्याचेही त्यांनी सांगितले.

बँकांनी शेतकऱ्यांकडे कर्जवसुलीसाठी जाऊ नये

- दुष्काळी परिस्थितीत बँकांनी शेतकऱ्यांकडे कर्जवसुलीसाठी जाऊ नये, असा स्पष्ट इशारा बावनकुळे यांनी दिला. तसे झाल्यास सरकार कठोर कारवाई करेल, असे त्यांनी सांगितले. मुख्यमंत्री फडणवीस यांनी यासंदर्भात मुख्य सचिवांना सूचना दिल्या असून, जिल्हाधिकाऱ्यांनी आपल्या जिल्ह्यातील सर्व बँकांच्या अधिकाऱ्यांना बोलावून आवश्यक सूचना द्याव्यात, असे निर्देश देण्यात आले आहेत.

- पतसंस्था, राष्ट्रीयीकृत बँका, खासगी बँका किंवा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका अशा कोणत्याही संस्थेने दुष्काळी परिस्थितीत शेतकऱ्यांकडे कर्ज मागणी किंवा वसुलीसाठी जाऊ नये, असे निर्देश असल्याचे बावनकुळे यांनी सांगितले. अवैध सावकारी आढळल्यास ती मोडून काढण्यात येईल, असा इशाराही त्यांनी दिला. शेतकऱ्यांची फसवणूक करणाऱ्या आणि त्यांना गंभीर आर्थिक संकटात ढकलणाऱ्या प्रवृत्तींचा शोध घेतला जाईल, असे त्यांनी सांगितले.

- शेतकऱ्यांची सावकार किंवा बँकांकडून फसवणूक होत असल्यास त्यांनी सरकारच्या निदर्शनास आणून द्यावे, असे आवाहनही त्यांनी केले. मुख्यमंत्र्यांनी ११ सदस्यीय कॅबिनेट उपसमितीला पूर्ण अधिकार दिले असून २५ ऑक्टोबरपर्यंत अंतिम अहवाल सादर करण्याचा निर्णय घेण्यात आल्याचे बावनकुळे यांनी सांगितले

दैनिक
यश सिद्धि न्यूज



## संपादकीय....

### स्थगिती निर्णय स्वागतार्ह

खरीप २०२६ हंगामात दुष्काळी परिस्थिती घोषित करण्यात आलेल्या राज्यातील २६५ तालुक्यांतील शेतकऱ्यांना राज्य शासनाने मोठा दिलासा दिला आहे. या दुष्काळी तालुक्यांमधील शेतकऱ्यांनी घेतलेल्या अल्पमुदत पीक कर्जाचे मध्यम मुदतीच्या कर्जात पुनर्गठन करण्यास मान्यता देण्यात आली असून, शेतीशी निगडित कर्जाच्या वसुलीलाही तात्काळ स्थगिती देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. नुकतीच याची माहिती सहकारमंत्र्यांनी दिली. ३१ मार्चपर्यंत विहित मुदतीत पीक कर्जाची परतफेड करू न शकणाऱ्या आणि आर्थिक अडचणीत आलेल्या शेतकऱ्यांच्या संमतीने खरीप हंगामातील अल्पमुदत पीक कर्जाचे मध्यम मुदतीच्या कर्जात पुनर्गठन केले जाईल. यामुळे शेतकऱ्यांना कर्ज फेडण्यासाठी अतिरिक्त मुदत मिळणार आहे. दुष्काळी घोषित करण्यात आलेल्या सर्व २६५ तालुक्यांमध्ये शेतीशी निगडित कर्जाच्या वसुलीवर स्थगिती असणार आहे. पीक कर्जाच्या पुनर्गठनाची सर्व प्रक्रिया बँकांनी ३० एप्रिल २०२७ पर्यंत पूर्ण करण्याचे निर्देश शासन परिपत्रकात देण्यात आले आहेत. तसेच, पुनर्गठन झालेल्या पात्र शेतकऱ्यांना पुढील खरीप हंगामासाठी नवीन पीक कर्ज उपलब्ध करून देण्याच्या सूचनाही बँकांना करण्यात आल्या आहेत. या निर्णयाची काटेकोर अंमलबजावणी करण्याची जबाबदारी सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था तसेच समन्वयक, राज्यस्तरीय बँकर्स समिती (बँक ऑफ महाराष्ट्र, शिवाजीनगर, पुणे) यांच्यावर सोपवण्यात आली आहे. नक्की ठरवून दिलेल्या कालमर्यादेत संबंधित यंत्रणांनी या निर्णयाची अंमलबजावणी करावी, अशा सक्त सूचना देण्यात आल्या असून यामुळे दुष्काळामुळे त्रस्त असलेल्या राज्यातील लाखो शेतकऱ्यांना दिलासा मिळणार आहे. शासनाकडून सर्वोतोपरी शेतकरी हिताचा निर्णय घेतला जात आहे. यामुळे ऐन दुष्काळात, या संकटात शेतकऱ्यांसह नागरिकांमध्ये या निर्णयाचे स्वागत केले जात आहे.

# गांधीजींचे स्वच्छतेचे विचार आणि आजचा भारत

जयंतीनिमित्त विशेष

२ ऑक्टोबर हा महात्मा गांधींचा जन्मदिन. हा दिवस देशभर गांधी जयंती म्हणून साजरा केला जातो. गांधीजींच्या जीवनाचा विचार केला की सत्य, अहिंसा, स्वराज्य, स्वदेशी, खादी आणि सामाजिक समता या मूल्यांची आठवण होते. मात्र गांधीजींच्या विचारविश्वातील एक महत्त्वाचा विषय म्हणजे स्वच्छता. स्वच्छता ही केवळ आरोग्याशी संबंधित बाब नसून ती व्यक्तीच्या शिस्तीशी, सामाजिक जबाबदारीशी आणि राष्ट्रीय चारित्र्याशी जोडलेली आहे, असा गांधीजींचा दृष्टिकोन होता. त्यामुळे गांधी जयंतीनिमित्त त्यांच्या स्वच्छतेविषयक विचारांकडे आजच्या भारताच्या संदर्भात पाहणे अधिक अर्थपूर्ण ठरते.

गांधीजींनी स्वच्छतेचा प्रश्न केवळ सार्वजनिक आरोग्याचा प्रश्न म्हणून पाहिला नाही. त्यांच्या दृष्टीने स्वच्छता ही चांगल्या समाजव्यवस्थेची मूलभूत अट होती. घर स्वच्छ ठेवणे, परिसर स्वच्छ ठेवणे, सार्वजनिक ठिकाणी कचरा न करणे, स्वच्छ पाणी आणि स्वच्छतागृहांची व्यवस्था असणे या गोष्टी नागरिकांच्या दैनंदिन जीवनाचा भाग असाव्यात, अशी त्यांची भूमिका होती. स्वातंत्र्य मिळाल्यानंतर देशाची प्रगती केवळ राजकीय किंवा आर्थिक विकासातून होणार नाही, तर नागरिकांच्या जीवनमानात सुधारणा झाल्याशिवाय ती पूर्ण होणार नाही, असा व्यापक विचार त्यांच्या कार्यातून दिसून येतो.

गांधीजी स्वतः स्वच्छतेच्या कामात सहभागी होत असत. समाजात काही कामे विशिष्ट जाती किंवा समाजघटकांचीच आहेत, अशी मानसिकता त्यांनी नाकारली. शौचालयांची स्वच्छता असो किंवा परिसराची साफसफाई असो, प्रत्येकाने स्वतःच्या जबाबदारीचा स्वीकार केला पाहिजे, असा त्यांचा आग्रह होता. त्यामुळे स्वच्छतेचा प्रश्न त्यांनी सामाजिक समतेशीही जोडला. एखादे काम कनिष्ठ समजून ते दुसऱ्यावर सोपविण्याऐवजी त्या कामाच्या सामाजिक महत्त्वाची जाणीव ठेवणे आवश्यक आहे, हा संदेश त्यांच्या आचरणातून मिळतो.

गांधीजींच्या स्वच्छतेच्या विचारामध्ये व्यक्तिगत स्वच्छता आणि सार्वजनिक स्वच्छता या दोन्हींचा समावेश होता. शरीर स्वच्छ ठेवणे, स्वच्छ कपडे वापरणे, परिसरात घाण न करणे याबरोबरच रस्ते, सार्वजनिक विहिरी, पाणवठे आणि इतर सार्वजनिक जागा स्वच्छ ठेवण्याची जबाबदारीही नागरिकांनी स्वीकारली पाहिजे. सार्वजनिक जागा 'कोणाचीच नाही' अशी मानसिकता स्वच्छतेच्या दृष्टीने घातक आहे. सार्वजनिक जागा ही सर्वांची असल्याने तिची जबाबदारीही सर्वांचीच असते.



आजच्या भारतात स्वच्छतेच्या क्षेत्रात मोठे बदल झाले आहेत. ग्रामीण आणि शहरी भागात स्वच्छतागृहांची उपलब्धता वाढविणे, उघड्यावर शौचास जाण्याचे प्रमाण कमी करणे, कचरा व्यवस्थापन, स्वच्छ पाणी आणि जनजागृती यासाठी विविध उपक्रम राबविले गेले आहेत. स्वच्छतेचा विषय राष्ट्रीय विकासाच्या चर्चेच्या केंद्रस्थानी आला आहे. मात्र केवळ सुविधा निर्माण करणे पुरेसे नाही; त्या सुविधांचा योग्य वापर आणि देखभाल करण्याची नागरिकांची सवयही तितकीच महत्त्वाची आहे.

आजच्या शहरी जीवनात कचरा व्यवस्थापन हे मोठे आव्हान आहे. घरातून निर्माण होणारा ओला आणि सुका कचरा वेगळा करणे, प्लास्टिकचा अनावश्यक वापर टाळणे, सार्वजनिक ठिकाणी कचरा न टाकणे आणि कचऱ्याची योग्य विल्हेवाट लावणे या साध्या गोष्टींमधून स्वच्छतेची संस्कृती निर्माण होऊ शकते. मोठमोठ्या स्वच्छता मोहिमा काही काळासाठी परिणामकारक ठरू शकतात; परंतु स्वच्छता ही दैनंदिन सवय झाली तरच तिचा कायमस्वरूपी परिणाम दिसून येईल.

गांधीजींच्या विचारांचा आणखी एक महत्त्वाचा पैलू म्हणजे स्वच्छता आणि आरोग्य यांचा संबंध. अस्वच्छ परिसरामुळे रोगराई वाढण्याची शक्यता असते. दूषित पाणी, साचलेले पाणी, कचऱ्याचे ढीग आणि अस्वच्छ सार्वजनिक ठिकाणे आरोग्यासाठी धोकादायक ठरू शकतात. त्यामुळे स्वच्छता ही केवळ सौंदर्याची बाब नसून सार्वजनिक आरोग्याचा अविभाज्य भाग आहे. आजच्या काळात संसर्गजन्य रोगांपासून बचाव, सुरक्षित पाणी आणि आरोग्यदायी जीवनशैली यासाठी स्वच्छतेचे महत्त्व अधिक स्पष्ट झाले आहे.

गांधीजींच्या स्वच्छतेच्या विचारात स्वावलंबनही दिसते. आपल्या घराची, शाळेची, महाविद्यालयाची किंवा परिसराची स्वच्छता करण्यासाठी केवळ शासन किंवा स्थानिक स्वराज्य संस्थांवर अवलंबून राहणे योग्य नाही. प्रशासनाने आवश्यक सुविधा आणि व्यवस्था निर्माण करणे ही त्यांची जबाबदारी आहे; परंतु त्या व्यवस्थेचा योग्य वापर करणे आणि परिसर अस्वच्छ न ठेवणे ही नागरिकांची जबाबदारी आहे. शासन आणि नागरिक यांच्या सहभागातूनच स्वच्छ समाज निर्माण होऊ शकतो.

शैक्षणिक संस्थांची भूमिका या संदर्भात विशेष महत्त्वाची आहे. विद्यार्थ्यांना स्वच्छतेचे महत्त्व केवळ भाषणातून सांगण्यापेक्षा प्रत्यक्ष कृतीतून शिकवले पाहिजे. परिसर स्वच्छ ठेवणे, कचऱ्याचे वर्गीकरण करणे, पाणी वाचवणे, प्लास्टिकचा वापर कमी करणे आणि सार्वजनिक मालमत्तेची काळजी घेणे या सवयी विद्यार्थ्यांमध्ये रुजविल्या तर त्याचा परिणाम त्यांच्या कुटुंबावर आणि समाजावरही होतो. स्वच्छतेची संस्कृती ही बालपणापासून विकसित होणे आवश्यक आहे.

गांधीजींच्या स्वच्छतेच्या विचारांचा संबंध पर्यावरणाशीही जोडता येतो. कचरा कमी करणे, वस्तूंचा अनावश्यक वापर टाळणे, पुनर्वापराला प्रोत्साहन देणे आणि नैसर्गिक संसाधनांचा संयमाने वापर करणे या सवयी पर्यावरणाचे संरक्षण करण्यास मदत करतात. त्यामुळे स्वच्छता ही केवळ झाडू हातात घेऊन रस्ते साफ करण्यापुरती मर्यादित न राहता जबाबदार जीवनशैलीचा भाग झाली पाहिजे.

गांधी जयंतीच्या दिवशी विविध ठिकाणी स्वच्छता उपक्रम आयोजित केले जातात. अशा उपक्रमांचे महत्त्व नक्कीच आहे; परंतु गांधीजींच्या विचारांचा खरा अर्थ तेव्हाच साध्य होईल जेव्हा स्वच्छता एखाद्या दिवसापुरती मर्यादित न राहता वर्षभराच्या आचरणाचा भाग बनेल. २ ऑक्टोबरला स्वच्छता अभियान करून दुसऱ्या दिवशी पुन्हा सार्वजनिक ठिकाणी कचरा टाकणे ही गांधीजींच्या विचारांची अंमलबजावणी ठरणार नाही. स्वच्छता हा उत्सव नसून संस्कार आहे, ही भूमिका स्वीकारावी लागेल.

आज गांधीजींच्या जयंतीनिमित्त त्यांच्या प्रतिमेला अभिवादन करताना त्यांच्या विचारांना आपल्या कृतीशी जोडण्याची गरज आहे. स्वतःपासून सुरुवात करणे, आपल्या घराचा आणि परिसराचा स्वच्छतेने सांभाळ करणे, सार्वजनिक ठिकाणी जबाबदारीने वागणे, कचऱ्याचे योग्य व्यवस्थापन करणे आणि इतरांमध्येही स्वच्छतेची जाणीव निर्माण करणे, हीच गांधीजींना खरी आदरांजली ठरू शकते.

महात्मा गांधींच्या स्वच्छतेच्या विचारांचा गाभा साधा आहे–स्वच्छ व्यक्ती, स्वच्छ घर, स्वच्छ परिसर आणि जबाबदार समाज यांतूनच स्वच्छ राष्ट्राची निर्मिती होते. गांधी जयंतीनिमित्त त्यांच्या प्रतिमेला पुष्प अर्पण करण्याबरोबरच स्वच्छतेची जबाबदारी स्वीकारण्याचा संकल्प केला, तर गांधीजींच्या विचारांचे स्मरण अधिक अर्थपूर्ण ठरेल.

**डॉ. भारत कऱ्हाड, प्राचार्य, वराडकर महाविद्यालय दापोली, जिल्हा रत्नागिरी.**

# अहिंसा धर्म: काया वाचा मने हिंसा टाळावी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

**(२–८ ऑक्टोबर:आंतरराष्ट्रीय अहिंसा दिन सप्ताह.)**

आंतरराष्ट्रीय अहिंसा दिन दरवर्षी २ ऑक्टोबर रोजी साजरा केला जातो, जो थोर तत्ववेत्ते महापुरुष महात्मा मोहनदास गांधीजी आणि लालबहादूर शास्त्रीजी यांच्या जयंतीचा दिवस आहे. गांधीजींनी अहिंसेचा मार्ग दाखवून जगाला शांतता आणि सहिष्णुतेचे महत्त्व पटवून दिले. या दिवसाचा उद्देश जगभरातील लोकांना अहिंसा आणि शांततेच्या तत्त्वांचा स्वीकार करण्यासाठी प्रेरित करणे आहे. सदर मार्गदर्शक संकलित लेख श्री कृष्णकुमार आनंदी- गोविंदा निकोडे गुरुजींची प्रस्तुती जी.... संपादक.

अहिंसा म्हणजे केवळ शारीरिक हिंसाचार न टाळता विचार, शब्द आणि कृतींमध्येही शांतता राखणे. या तत्त्वावर आधारित समाज अधिक समजूतदार, सहकार्यशील आणि शांततापूर्ण बनू शकतो. संघर्ष, युद्ध आणि तणावमुक्त जग निर्माण करण्यासाठी अहिंसेची शिकवण अत्यंत आवश्यक आहे. आंतरराष्ट्रीय अहिंसा दिनाच्या निमित्ताने, जगभरात अहिंसेच्या संदेशाचा प्रचार केला जातो आणि सामाजिक, आर्थिक, राजकीय असमानता सोडवण्यासाठी संवाद, सहकार्य आणि सहानुभूती यांचा अवलंब करण्यास प्रवृत्त केले जाते. या दिवशी लोकांना गांधीजींच्या शिकवणीचे महत्त्व पटवून दिले जाते आणि त्यांच्या तत्त्वांच्या अनुसरणावर भर दिला जातो.

अहिंसा म्हणजे काया, वाचा व मनाने कोणत्याही सजीवाला इजा, दुखापत किंवा पीडा न पोहोचविणे ही भारतीय तत्त्वज्ञानातील एक महत्त्वाची नैतिक संकल्पना आहे. अहिंसेचे स्वरूप व व्यापकता: १) अर्थ: हिंसा न करणे म्हणजे अहिंसा. ही केवळ शारीरिक हिंसा टाळण्यापुरती मर्यादित नाही. २) तीन स्तर: विचार –मन, वाणी- वाचा आणि कृती- कर्म या तिन्हींमधून इतरांना हानी न पोहोचविणे. ३) व्यापक दृष्टीकोन: सर्व प्राणिमात्रांप्रती करुणा आणि प्रेम ठेवणे हा अहिंसेचा मूळ उद्देश आहे. धार्मिक महत्त्व: ॰ जैन धर्म: जैन धर्मामध्ये अहिंसेला सर्वोच्च धार्मिक आणि नैतिक आदर्श- महाव्रत मानले गेले आहे. ॰ बौद्ध धम्म: बौद्ध धम्मात पंचशीलात अहिंसेला पहिले स्थान दिले असून सर्व प्राण्यांवर दया दाखवण्यास सांगितले आहे. ॰ हिंदू धर्म: हिंदू धर्मातील विविध ग्रंथांमध्ये व दर्शनांमध्ये अहिंसेला धर्म पालनाचे मुख्य अंग मानले आहे.

महात्मा गांधींजींचे कार्य- १ सत्याग्रह: महात्मा गांधींनी स्वातंत्र्यलढ्यात सत्याग्रह व अहिंसा या तत्त्वांचा प्रभावी वापर केला. २ जागतिक अहिंसा दिन: गांधीजींच्या व शास्त्रीजींच्या जयंतीनिमित्त २ ऑक्टोबर हा दिवस आंतरराष्ट्रीय अहिंसा दिन म्हणून पाळला जातो. अहिंसा ही भारतीय तत्त्वज्ञानातील एक महत्त्वाची नैतिक संकल्पना आहे. काया, वाचा व मन यांनी कोणत्याही सजीवाला इजा, दुखापत किंवा पीडा न पोहोचविणे याला अहिंसा असे म्हणतात. हिंदू धर्म, जैन धर्म आणि बौद्ध धम्म यांमध्ये अहिंसेला विशेष महत्त्व देण्यात आले आहे. अहिंसा ही केवळ शारीरिक हिंसा टाळण्यापुरती मर्यादित नसून विचार, वाणी आणि कृती यांमधून इतरांना हानी न पोहोचविण्याचा व्यापक जीवनदृष्टिकोन मानला जातो. जैन धर्मात अहिंसा हा सर्वोच्च धार्मिक आणि नैतिक आदर्श मानला जातो. बौद्ध धम्मात सर्व प्राणिमात्रांप्रती करुणा आणि अहिंसक वर्तन यांवर भर दिला जातो, तर हिंदू धर्मातील अनेक ग्रंथांमध्येही अहिंसेचे महत्त्व प्रतिपादित केले आहे.

महात्मा मोहनदास गांधीजी यांनी अहिंसेच्या तत्त्वाचा सामाजिक व राजकीय संघर्षामध्ये प्रभावीपणे उपयोग केला. भारताच्या स्वातंत्र्यलढ्यात सत्याग्रह आणि अहिंसक प्रतिकार या माध्यमांतून त्यांनी या तत्त्वाचा प्रसार केला. या संदर्भात स्मितहास्य महत्त्वाचं ठरतं. लोकांना स्मित करायला आवडतं, संतापायला किंवा गंभीर चेहऱ्याने बसायला आवडत नाही. मुलांना, आणि अगदी कुत्र्यांनाही स्मितहास्य करायला आवडतं. तुम्ही कुत्र्याकडे पाहून स्मित करता, तेव्हा तो तुमच्याकडे पाहून शेपूट हलवतो. तुम्ही कुत्र्याला खाणं दिलंत आणि तुमचा चेहरा अतिशय गंभीर असेल, तर कुत्रा खाणं घेतो, पण निघून जातो.

पौराणिक ग्रंथातील सदर श्लोक अतंयत लोकप्रिय आणि खास मार्गदर्शक आहे- अहिंसा परमो धर्मः, धर्महिंसा तथैव च। अहिंसा परमं दानम्, अहिंसा परमं तपः।। (पवित्र महाभारत: आदि पर्व आणि अनुशासन पर्व.)

श्लोकाचा सविस्तर मराठी अर्थ- हा श्लोक वेगवेगळ्या संदर्भासह आढळतो. या श्लोकाचे दोन मुख्य अर्थ आणि पैलू पुढीलप्रमाणे आहेत: १ सामान्य जीवन आणि अध्यात्मातील अर्थ (पहिली बाजू): ॰ अहिंसा परमो धर्मः काया- शरीर, वाचा–वाणी आणि मनाने कोणत्याही सजीवाला इजा किंवा दुखापत न पोहोचवणे हा माणसाचा सर्वात सर्वोच्च धर्म- कर्तव्य आहे. ॰ अहिंसा परमं दानम्: कोणालाही अभय देणे किंवा कोणाचेही नुकसान न करणे हे जगातले सर्वश्रेष्ठ दान आहे. ॰ अहिंसा परमं तपः आपल्या भावनांवर, रागावर नियंत्रण ठेवून सर्वांशी प्रेमाने वागणे हेच सर्वात मोठे तप आहे. २ कर्तव्य आणि धर्मरक्षणाचा अर्थ (दुसरी बाजू): ॰ धर्महिंसा तथैव च: सामान्य परिस्थितीत अहिंसा हाच श्रेष्ठ मार्ग असला, तरीही जेव्हा सत्य, न्याय आणि धर्मावर संकट येते किंवा स्वतःच्या/देशाच्या रक्षणाचा प्रश्न येतो, तेव्हा अधर्माचा नाश करण्यासाठी केलेली हिंसा ही सुद्धा धर्माचाच एक भाग मानली जाते. अन्याय सहन करणे हा अहिंसावाद नाही, तर अन्यायाविरुद्ध उभे राहणे हेही कर्तव्य ठरते. अहिंसेचे तीन प्रकार- मराठीत- हिंदू आणि जैन धर्मग्रंथांनुसार अहिंसा केवळ शारीरिक मारामारी न करण्यापुरती मर्यादित नसून ती तीन स्तरांवर पाळली पाहिजे: १). मानसिक अहिंसा: मनात कोणाबद्दलही वाईट विचार न आणणे किंवा मत्सराची भावना न ठेवणे. २). वाचिक अहिंसा: आपल्या बोलण्यातून किंवा शब्दांतून कोणाचेही मन न दुखावणे. ३). शारीरिक अहिंसा: प्रत्यक्ष कृतीतून कोणत्याही प्राण्याला किंवा सजीवाला त्रास न देणे. विविध समाज माध्यमांवरुन सविनय साभार जी!

आंतरराष्ट्रीय अहिंसा दिनाच्या समस्त मानवतावादी बांधवांना सप्ताहभर हार्दिक हार्दिक शुभेच्छा जी

**– संकलन व सुलेखन –**
**श्रीकृष्णदास (बापू) निरंकारी.**
**राह. श्रीगुरूदेव हार्दिक कृपा निवास, पॉवर हाऊसच्या मागे, एकता चौक, रामनगर वॉर्ड, गडचिरोली.**
**फक्त मधुभाष– ९६९९८३६७१७.**

# डॉ.श्रीहरी राजाराम बुडगेमवार यांचा क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले समाज रत्न पुरस्कार देऊन गौरव

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

लातूर: प्रतिनिधि, सुधाकर रणदिवे : महाराष्ट्र पोलीस मित्र सोशल असोसिएशन (महाराष्ट्र राज्य) यांच्यातर्फे.. डॉक्टर श्रीहरी राजाराम बुडगेमवार(आद्या डायग्नोस्टिक सेंटरचे संचालक) तथा अभिव्यक्ता यांचा क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले समाज रत्न पुरस्कारदेऊन गौरव करण्यात आला.

या दिवशी लातूर येथे पुरस्कार वितरण सोहळा होता. परंतु डॉक्टर साहेबांच्या अतिव्यस्त कामामुळे त्यांना पुरस्कार प्रदान सोहळ्यास जाता आले नाही. तरीपण पुरस्कार समितीचे सचिव व समितीचे सदस्य मुखेड येथे येऊन आध्या डायग्नोस्टिक सेंटरमध्ये छोटेखानी कार्यक्रम घेऊन त्यांना क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले समाज रत्न पुरस्कार देऊन त्यांचा गौरव केला. महाराष्ट्र पोलीस मित्र सोशल असोसिएशनचे संस्थापक सचिव... डॉक्टर सुफी सय्यद समशोद्दीन

सौ.जानवी सोनसळे (जिल्हाध्यक्ष लातूर), सौ संगीता कांबळे (जिल्हा कार्याध्यक्ष लातूर), सौ कुसुम थोरे (जिल्हा सचिव लातूर), सौ अश्विनी शिंदे (उपाध्यक्ष तालुका निलंगा), सौ छायादेवी कांबळे(शहर प्रतिनिधी लातूर), सौ रेखा सरवदे (शहर प्रतिनिधी लातूर) या मान्यवरांनी आपल्या वेळातली वेळ काढून डॉक्टर श्रीहरी राजाराम बुडगेमवार यांच्या सामाजिक कार्याची दखल घेऊन त्यांना त्यांच्या स्वगृही येऊन पुरस्कार प्रदान केला. या छोटेखानी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. कुंटेवाड



इरेश भुमन्ना सरांनी केले. महाराष्ट्र पोलीस मित्र सोशल असोसिएशनचे संस्थापक सचिव डॉ.सुफी सय्यद समशोद्दीन यांचा सत्कार डॉक्टर बुडगेमवार साहेबांनी केला.आलेल्या सर्व भगिनीचे स्वागत सत्कार आद्या डायग्नोस्टिक सेंटरच्या संपूर्ण महिला कर्मचाऱ्यांनी केला. कार्यक्रमाच्या प्रस्तावनेत डॉक्टर श्रीहरी राजाराम बुडगेमवार यांचे वैद्यकीय कार्य, त्यांच्या सामाजिक कार्याचे दायित्व निस्वार्थपणे केलेली त्यांची सेवा त्यामुळे त्यांना अनेक पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.त्यांना असणारी समाजसेवेची आवड... आपल्या व्यस्त कामातून वेळ काढून सामाजिक कार्यात त्यांचा असणारा सहभाग यांचे सविस्तर विवेचन प्रा. कुंटेवाड सरांनी करून दिला.

यानंतर या सत्कार समितीचे संस्थापक सचिव व सत्कार समितीचे सर्व सदस्य यांच्यातर्फे डॉक्टर श्रीहरी राजाराम बुडगेमवार यांचा शाल, पुष्पहार, क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले समाज रत्न पुरस्काराचे मोमेंटो व सन्मानपत्र देऊन त्यांचा गौरव करण्यात आला.

हा पुरस्कार कुणाला व कशामुळे,का दिला जातो. या राज्यस्तरीय पुरस्काराचे महत्त्व... सामाजिक कार्याचे दायित्व, सामाजिक कार्याची ओढ असणाऱ्या व्यक्तीस, समाजाचे आम्ही काही देणे लागतो. असे विचार करून आपल्या व्यस्त कामातून वेळ काढून सामाजिक कार्यात झोकून देऊन काम करणाऱ्या व्यक्तीस हा पुरस्कार दिला जातो. सबंध राज्यातील ११ लोकांना हा पुरस्कार दिल्या गेला.त्यातील एक डॉक्टर श्रीहरी राजाराम बुडगेमवार हे होत. या पुरस्कार समितीचे संस्थापक सचिव डॉ. सुफी सय्यद समशोद्दीन यांनी या पुरस्काराबद्दल सविस्तर विवेचन केले. हा पुरस्कार डॉक्टर साहेबाला देऊन या पुरस्काराचे महत्त्व वाढले.असे उद्गार त्यांनी आपल्या छोटेखानी भाषणात केले. यानंतर आपल्या सत्काराला उत्तर देत सत्कारमूर्ती डॉक्टर श्रीहरी राजाराम बुडगेमवार यांनी आपल्या सामाजिक कार्याची थोडक्यात माहिती दिली. मला लहानपणापासून सामाजिक कार्याची ओढ आहे. लोक मला वेडा म्हणतात. आपले काम सोडून सामाजिक कार्य करण्याचा यांना मोठा शौक आहे. मी लोकाकडे न पाहता न ऐकता मला जे आवडते ते मी मनापासून करणारा व्यक्ती आहे. सामाजिक कार्य करण्यात माणूस वेडाच झाला पाहिजे. आणि हे काम मी सतत करत राहणार. असे विचार त्यांनी मांडले. मी जरी माझ्या व्यस्त कामातून पुरस्कार घेण्यास लातूर येथे गेलो नाही, तरीपण पुरस्कार समितीने माझ्या घरी येऊन मला पुरस्कार दिला. याबद्दल मी पुरस्कार समितीचे ऋण व्यक्त करतो. मला जो आनंद तिथे जाऊन पुरस्कार घेण्यात जेवढा प्राप्त झाला नसता.. त्याहून अधिक आनंद मला आज प्राप्त झाला. असे भावपूर्ण उद्गार त्यांनी काढले. या पुरस्कारामुळे माझी जबाबदारी अजून वाढली.मी उत्साहाने माझ्या कामात तत्पर राहणार.आपण जे माझा पुरस्कार देऊन मान सन्मान, आदर सत्कार केलात त्याबद्दल मी या सत्कार समितीचे शतशः ऋणी राहील. असे उद्गार व्यक्त करून आपले छोटे छोटेखानी भाषणाला पूर्णविराम दिला. या छोटेखानी कार्यक्रमात किशनरावजी इंगोले (जगदीश चंद्र पॅथॉलॉजीचे संचालक) तथा पोलीस पाटील (बेरळी बु) आपल्या वेळातली वेळ काढून उपस्थित होते. तसेच आध्या डायग्नोस्टिक सेंटरचा संपूर्ण कर्मचारीवर्ग,रुग्णाचे नातेवाईक व साहेबांचे मित्र मंडळ या कार्यक्रमासाठी उपस्थित होते.

प्रा. कुंटेवाड सरांनी सत्कार सोहळ्याच्या छोटेखाणी कार्यक्रमास उपस्थित असलेल्या सर्व मान्यवरांचे आभार व्यक्त करून. कार्यक्रम पूर्ण झाल्याचे जाहीर केले.

# फ्लायदुबई विमानात पायलटवर प्राणघातक हल्ला; युएईकडून दहशतवादी कोनाची शक्यता तपासण्यासाठी उच्चस्तरीय चौकशीचे आदेश

(पान १ वरून...)

अल शम्सी यांनी सरकारी वकिलांच्या तज्ज्ञ सदस्यांची एक विशेष चौकशी समिती स्थापन करण्याचे आदेश दिल्याचे परराष्ट्र मंत्रालयाने सोशल मीडिया प्लॅटफॉर्म 'द' वर स्पष्ट केले. परराष्ट्र मंत्रालयाने दिलेल्या माहितीनुसार, हे विमान युएईमध्ये नोंदणीकृत असून त्यावर युएईचा ध्वज आहे. त्यामुळे आंतरराष्ट्रीय कायद्यानुसार, देशाच्या हद्दीबाहेर जरी अशी घटना घडली असली, तरी या गुन्ह्याचा तपास करण्याचा आणि कायदेशीर कारवाई करण्याचा पूर्ण अधिकार युएई प्रशासनालाच आहे. या तपासादरम्यान सहपायलटचा मुख्य हेतू काय होता, यामागे काही पूर्वयोजना होती का, तसेच या घटनेचा थेट संबंध कोणत्याही दहशतवादी संघटनेशी किंवा हालचालींशी आहे का, या सर्व बाबींची सखोल चौकशी केली जाणार आहे. या कठीण प्रसंगात सहकार्य आणि योग्य समन्वय दाखवल्याबद्दल युएईने सौदी अरेबियाच्या प्रशासनाचे विशेष आभार मानले आहेत. तसेच, तपास पूर्ण होऊन अधिकृत माहिती समोर येत नाही तोपर्यंत नागरिकांनी आणि माध्यमांनी कोणत्याही अफवांवर किंवा बिनबुडाच्या माहितीवर विश्वास ठेवू नये आणि ती पसरवू नये, असे आवाहनही युएई परराष्ट्र मंत्रालयाकडून करण्यात आले आहे. दुसरीकडे, विमान वाहतूक क्षेत्रातील तज्ज्ञांनी या प्रसंगाबाबत प्रचंड आश्चर्य व्यक्त केले आहे.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल – yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय** : सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय** : प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

# ...अन्यथा साखर कारखाने बंद पाडणार

## ऊस दर संघर्ष समिती जिल्हाध्यक्ष दीपक भोसले यांची माहिती

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

प्रतिनिधी /पंढरपूर

ऊस दर शंकर समिती यांच्या वतीने महाराष्ट्रातील सर्व शेतकरी संघटना व ऊस उत्पादक शेतकरी दिल्ली येथे जंतर-मंतरवर दिनांक ५ सप्टेंबर व ६ ऑक्टोबर २०२६ रोजी आंदोलन करणार आहे या दिल्ली येथील जंतर मंतर वरील आंदोलनाला सोलापूर जिल्ह्यातील दोन ते तीन हजार ऊस उत्पादक शेतकरी जाणार आहेत अशी माहिती सोलापूर जिल्हा अध्यक्ष दीपक भोसले यांनी पत्रकार परिषदेमध्ये सांगितले आहे.

ऊस दर संघर्ष समितीच्या मागण्या पुढील प्रमाणे असून १) साखरेचे आधारभूत किंमत पन्नास रुपये करावी, २) उसापासून च्या इथेनॉलवर ७५ रुपये प्रति लिटर करावा, ३) साखर जीवनावश्यक यादी मधून वगळण्यात यावी, ४) घरगुती वापरण्यासाठी लागणारी व उद्योगासाठी लागणारी साखरकोटा वेगवेगळ्या निश्चित करून त्यांची दर ही अनुक्रमे ५० रुपये व १०० रुपये करावे, ५) दोन कारखान्याम धील हवाय अंतरली अट रद्द करावी अशा प्रमुख मागण्या घेऊन महाराष्ट्रातील सर्व शेतकरी संघटना व ऊस उत्पादक शेतकरी दिल्ली येथे जंतर-मंतर दिनांक पाच व सहा ऑक्टोबर २०२६ रोजी



आंदोलन करणार आहेत या आंदोलनाला संपूर्ण महाराष्ट्र मधून पाठिंबा मिळत असून दिल्ली येथे ऊस उत्पादक शेतकऱ्यांचे आंदोलन करून शेतकऱ्यांच्या शेतमालाला व ऊस दर बाबत झोपेचे सोंग घेणारे भाजप सरकारला जागी करण्याची काम पूजदर संघर्ष समितीचे करणार आहे अशी माहिती शेतकरी नेते दीपक भोसले यांनी सांगितले आहे.

संपूर्ण देशामध्ये सर्व वस्तूंचे व मालाचे भाऊ वाढ झालेली परंतु ऊस उत्पादक शेतकऱ्यांना शेतमालाला भाव व दर वाढलेला नाही. उसाला लागणारे खत व अन्य फवारणी खर्च मोठ्या प्रमाणात वाढलेला असून परंतु रोज दर हा अतिशय कमी प्रमाणात दिला जातो उसाचे उत्पादन खर्च वाढलेला आहे परंतु उसाला दर मिळालेला नाही त्याचप्रमाणे सहकारी साखर कारखान्याच्या बरोबरीनेच. खाजगी साखर कारखाने मोठ्या प्रमाणात झाल्यामुळे आज पर्यंत या नेतेमंडळी सहकार क्षेत्र मोडीत काढले आहे.

ऊस क्षेत्रघटलेले आहे त्यामुळे शेतकऱ्यांची वाईट अवस्था झालेली आहे. पाच व सात नंबर रोजी आंदोलन करणार आहे त्या आंदोलनाला महाराष्ट्र राज्यातील माजी खासदार राजू शेट्टी शेतकरी नेते व अन्य शेतकरी नेते मंडळी व कार्यकर्ते उत्पादक शेतकरी हे आंदोलनामध्ये सामील होणार आहेत या आंदोलनानंतर ६ ऑक्टोबर रोजी वाणिज्य विभाग मंत्रालय तसेच सहकार मंत्रालय या मंत्रालयाला शेतकऱ्यांच्या मागण्याबाबत थेट भेट घेणार आहेत.

केंद्र सरकारची लक्ष वेधण्यासाठी जंतर-मंतरवर गेल्या सात ते आठ वर्षापासून एम एस पी वाढवलेली नाही आणि एम एस पी न वाढल्यामुळे सर्व कारखाने अडचणीत आहेत शेतकरी संघटना व विविध प्रकारच्या आहेत या सर्व संघटना शेतकऱ्यांच्या अडीअडचणी सोडवण्यासाठी सर्व संघटना एकत्र येऊन ऊस दर संघर्ष समितीच्या माध्यमातून शेतकऱ्यांच्या मागण्या सरकारकडून मंजूर करून घेण्याचा प्रयत्न करीत आहे केंद्र सरकार जोपर्यंत निर्णय घेत नाही तोपर्यंत आमचा हा लढा सुरूच राहणार आहे.

साखर कारखाने लवकर सुरू झाल्यास शेतकरी व कारखानदाराचे नुकसान होणार आहे रिकवरी कमी लागण्याची शक्यता आहे असे म्हणून कारखान्याने साखर कारखाने लवकर सुरू करू नये व साखर कारखानदारी शेतकऱ्यांच्या विरोधात कारखाने सुरू केल्यास हे सर्व कारखाने बंद पडणार अशी ठाम भूमिका ऊस उत्पादक संघर्ष समितीचे अध्यक्ष दीपक भोसले यांनी व्यक्त केले आहे.

पत्रकार परिषदेस सचिन पाटील, प्राध्यापक सुहास पाटील, माऊली जवळेकर, अजित बोरकाटे, निवास नागणे सालगुडे पाटील, समाधान पाटील व शेतकरीही मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

# एनसीएमसी कार्डाच्या सक्तीमुळे एसटी प्रवाशांची गैरसोय

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

प्रतिनिधी/पंढरपूर

राजे परवान महामंडळाच्या बसमधून प्रवास करणारी ज्येष्ठ नागरिक व महिला दिव्यांग व इतर पात्र प्रवाशांना शासनाने जाहीर केलेल्या प्रवास सवलतीचा लाभ घेण्यासाठी एनसीएमसी कार्डाचे वापर करण्याची पद्धत सुरू करण्यात आली आहे. मात्र या कार्ड बाबत ग्रामीण भागातील प्रवाशांमध्ये



पुरुष माहिती नसल्यामुळे व कार्डमध्ये शिल्लक रक्कम व कार्डाबाबतची वापरण्याची माहिती त्यामुळे प्रवाशामध्ये गैर्य होत असल्याचे तक्रार पुढे येत आहे

### सवलत पूर्वीप्रमाणे आधार कार्डवर देण्याची मागणी

एनसीएमसी कार्डाचा वापर कसा वापर करायचा व कार्डाची रक्कम किती शिल्लक हे कसे रिचार्ज करायचे व सवलतीची रक्कम कशी येथे अनेक महिला व ज्येष्ठ नागरिक यापासून अभि नंद न असल्याचे माहिती घेत आहे. विशेषतः ग्रामीण भागातून ज्येष्ठ नागरिक वृद्ध महिला यांना उत्सव सामान्य नागरिकांना डिजिटल प्रक्रियेचा फटका बसत असल्याच्या तक्रारी येत आहेत

कार्डमध्ये शिल्लक रक्कम नसणे व कार्डाचे वापरताना तांत्रिक अडचणी येणे. ते कसे रिचार्ज होते व सवलती रक्कम कशी येते. अशा कारणामुळे बसमध्ये वाहक व प्रवाशांमध्ये व निर्माण होत असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. प्रवाशांना सवलतीचा लाभ मिळवून देण्याची जबाबदारी वाहकाच्या असल्याने वाघाच्या तातिक अडचणीमुळे तो लाभ प्रवचना मिळत नसल्यामुळे त्यांना सामना करावा लागत आहे. यापूर्वी पात्र प्रवाशांना आधार कार्ड सवलतीचा फायदा मिळत होता. आधार कार्ड सोबत असल्यामुळे प्रवाशांना प्रवास करणे हे सुलभ होत होते. एनसीएमसी कारणामुळे आता प्रवाशांना सवलत मिळत नसल्यामुळे त्यांनी त्यांच्या भावना व्यक्त केल्या आहेत. शासनाने प्रवाशांना सवलत देण्याचा निर्णय घेतला असला तरी ती सवलत मिळवण्यासाठी नागरिकांना गुंतागुंतीच्या प्रक्रियेमध्ये अडकवणे अशी प्रवाशांची मागणी होत आहे. एनसीएमसी कार्डाच्या अडचणी येत असेल तर प्रवाशांना पूर्वीप्रमाणे सवलत देण्यात यावी अशी नागरिकांतून मागणी होत आहे.

---

**सामाजिक बांधिलकी जपत संघर्ष तरुण मंडळाचा उपक्रम**

# संघर्ष तरुण मंडळाकडून शाळेच्या रंगकामासाठी ५ हजारांची मदत

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

टाकळीवाडी/प्रतिनिधी :

टाकळीवाडी तालुका शिरोळ येथील संघर्ष तरुण मंडळ, टाकळीवाडी यांच्या वतीने सामाजिक बांधिलकी जपत यंदाच्या गणेशोत्सवातील वर्गणीतून विद्या मंदिर टाकळीवाडी शाळेच्या रंगकामासाठी ५ हजार रुपयांची आर्थिक मदत करण्यात आली.



गणेशोत्सव हा केवळ धार्मिक उत्सव न राहता सामाजिक उपक्रमांना चालना देणारा ठरावा, या उद्देशाने मंडळाने हा उपक्रम राबविला. शाळेच्या रंगकामासाठी मदत देत मंडळाने शिक्षण क्षेत्रालाही हातभार लावला आहे.

संघर्ष तरुण मंडळाच्या या सामाजिक उपक्रमाचे ग्रामस्थ, शिक्षक व पालकांकडून कौतुक होत असून, गणेशोत्सवाच्या माध्यमातून सामाजिक बांधिलकी जपण्याचा मंडळाचा उपक्रम इतर मंडळांसाठीही प्रेरणादायी ठरत आहे.

# निफाड येथे गांधी जयंतीनिमित्त विशेष स्वच्छता मोहीम उत्साहात संपन्न

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड /प्रतिनिधी : निफाड नगरपंचायतच्या वतीने 'स्वच्छता ही सेवा - २०२६' अभियानांतर्गत गांधी जयंतीनिमित्त एक दिवस, एक तास, एक साथ या संकल्पनेतून दिनांक ०१ ऑक्टोबर २०२६ रोजी संगमेश्वर मंदिर परिसरात, विशेष स्वच्छता मोहिमेचे आयोजन करण्यात आले.

या स्वच्छता मोहिमेत निफाड नगरपंचायतीच्या अधिकारी, कर्मचारी तसेच नागरिकांच्या सहभागातून संगमेश्वर मंदिर परिसराची स्वच्छता करण्यात आली. परिसरातील कचरा संकलित करून त्याची योग्य विल्हेवाट लावण्यात आली. तसेच नागरिकांमध्ये स्वच्छता, कचरा व्यवस्थापन व सार्वजनिक ठिकाणे स्वच्छ ठेवण्याबाबत जनजागृती करण्यात आली. एक दिवस, एक तास, एक साथ या संकल्पनेतून आयोजित करण्यात आलेल्या या मोहिमेला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. स्वच्छ आणि सुंदर निफाड शहराच्या निर्मितीसाठी नागरिकांनी स्वच्छता उपक्रमांमध्ये नियमितपणे सहभागी होण्याचे आवाहन यावेळी करण्यात आले.




**या प्रसंगी निफाड नगरपंचायतीत आरोग्य तपासणी शिबिर उत्साहात संपन्न**

स्वच्छता ही सेवा अभियान २०२६, सेवा संकल्प अभियान व छचडढए योजनेअंतर्गत निफाड नगरपंचायत, निफाड यांच्या वतीने स्वच्छता कर्मचारी तसेच नगरपंचायतीतील अधिकारी व कर्मचारी यांच्यासाठी मोफत आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन दिनांक ०१ ऑक्टोबर २०२६ रोजी आपला दवाखाना, निफाड नगरपंचायत येथे करण्यात आले.या शिबिरामध्ये स्वच्छता कर्मचारी तसेच नगरपंचायतीतील अधिकारी व कर्मचारी यांची विविध आरोग्य तपासणी करण्यात आली. तसेच आरोग्यविषयक आवश्यक मार्गदर्शन करण्यात आले. स्वच्छता कर्मचाऱ्यांचे आरोग्य, सुरक्षितता, सन्मान व सामाजिक सुरक्षा यांना प्राधान्य देण्याच्या उद्देशाने या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले.

कार्यक्रमाप्रसंगी निफाड नगरपंचायतीचे मुख्याधिकारी धीरज भामरे हे स्वतः उपस्थित राहून स्वच्छता कर्मचारी तसेच अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या आरोग्य तपासणीची पाहणी केली.... तसेच कर्मचाऱ्यांनी आपल्या आरोग्याची नियमित तपासणी करून घेणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. आरोग्य तपासणी शिबिरास स्वच्छता कर्मचारी, अधिकारी व कर्मचारी यांनी शिबिराचा लाभ घेतला. शिबिराच्या यशस्वी आयोजनासाठी निफाड नगरपंचायतीचे अधिकारी व कर्मचारी तसेच संबंधित आरोग्य विभागातील कर्मचाऱ्यांनी सहकार्य केले.

---

# अक्कलकोट शहरात राष्ट्रनेता व राष्ट्रपिता अभियान

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

प्रतिनिधी/अक्कलकोट राष्ट्रनेता ते राष्ट्रपिता भटके हक्क कागदपत्र अभियान सलग तीन दिवस २७.२८.२९ आहेत भटके विमुक्त विकास परिषद महाराष्ट्र प्रदेश यांच्यावतीने राष्ट्रनेता व राष्ट्रपिता हा अभियान अक्कलकोट शहरात दोन ठिकाणी बुधवार पेठ वडार गल्ली. तसेच गोल वस्ती माणिक पेठ ग्रामीण कटबु वस्ती कल्लीपुर्वी या शिबिर मध्ये तगछ्ढ बांधवांसाठी विविध शासकीय जात प्रमाण पत्र दाखले देण्यासाठी विशेष शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

हे शिबिर भटके विमुक्त विकास परिषद चे संघटन मंत्री राहुलजी चव्हाण व प्रदेशाध्यक्ष उद्धवजी काळे यांच्या मार्गदर्शनाखाली राज्यात राष्ट्रनेता व राष्ट्रपिता हे उपक्रम राज्यभर राबविण्यात आले. यासाठी माननीय जिल्हाधिकारी कार्तिकेय




साहेब निवासी जिल्हाधिकारी अभिजीत पाटील, इतर मागास बहुजन कल्याण विभागाचे गणेश सोनटक्के साहेब, दक्षिण सोलापूर तहसीलदार मा श्री विजय मगर साहेब यांचे सोलापूर जिल्ह्याचे सोलापूर जिल्हा अभियान प्रमुख व अशासकीय समिती सदस्य सुनील पवार. अशासकीय समिती सदस्य संजय राठोड अशासकीय समिती सदस्य निशांत परदेशी विशेष सहकार्य लाभले या शिबिराचे उद्घाटन नाय तहसीलदार अक्कलकोट श्री नदाफ सर नाय तहसीलदार श्री विजय वासेकर पुरवठा

संजय गांधी निराधार हिरेमठ निवडणूक शाखेचे सारणे सर

इतर समाजकल्याण बहुजन विभाग नाईक सर तालुका संयोजक हिरालाल राठोड . संयोजक शिवाजी चौगुलेसर आव्हाड तलाठी सुवास डोईफोडे कार्यवाह . मंडळ अधिकारी सुतार . तलाठी मयुर शिंदे आरोग्य डिपार्टमेंट श्री चेतन जाधव साहेब यांच्या हस्ते करण्यात आले.

| दाखल केलेले अर्ज | |
|---|---|
| १. जात प्रमाणपत्र | = १४१ |
| २. आधार कार्ड | = २३ |
| ३. रेशन कार्ड | = २०१ |
| ४. आयुष्यमान कार्ड | = १८१ |
| ५. अन्य | = १४५ |
| एकूण | = ६६८ |

यावेळी लाभार्थ्यांचे विविध प्रकारचे अर्ज भरून घेण्यात आलेतालुका अक्कलकोट जिल्हा सोलापूर. शिबिराचे ठिकाण. बुधवार पेठ वडार गल्ली गोल वस्ती माणिक पेठ अक्कलकोट कटवू वस्ती कल्लीपुर्गी राष्ट्रनेता ते राष्ट्रपिता अंतर्गत भटके मुक्त विकास परिषद तीन दिवस शिबिर घेण्यात आले आहे.

# निफाडमध्ये नवमतदार नोंदणीसाठी मतदार जागृती शिबिर संपन्न

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी : निफाड तालुक्यातील महाविद्यालयांमध्ये १८ वर्ष पूर्ण केलेल्या नवमतदारांमध्ये जनजागृती करण्यासाठी निफाड तहसील प्रशासनाच्या वतीने मतदार जागृती व नोंदणी शिबिराचे आयोजन करण्यात येत असून निफाड येथील वैनतेय विद्यालय व जूनियर कॉलेज ऑफ सायन्स आणि कर्मवीर गणपतदादा मोरे महाविद्यालयात ही शिबिरे घेण्यात आली

वैनतेय विद्यालयातील कार्यक्रमात निवडणूक नायब तहसीलदार राजेंद्र वराडे, वैनतेय विद्यालयाच्या प्राचार्या मनीषा गुजराथी, उपप्राचार्या रंजना लाहोटी, पर्यवेक्षक बाळासाहेब गुंजाळ, पर्यवेक्षक चंद्रकांत जाधव ,वैनतेय ज्युनिअर कॉलेज ऑफ सायन्सचे विभागप्रमुख विजय साळुंखे, आदी उपस्थित होते.




यावेळी मार्गदर्शन करताना निवडणूक नायब तहसीलदार राजेंद्र वराडे म्हणाले, लोकशाहीमध्ये प्रत्येकाने मतदानाचा अधिकार बजावला पाहिजे. भारतीय राज्यघटनेने प्रत्येकाला मतदानाचा अधिकार दिलेला आहे त्यासाठी मतदार यादीत नाव असणे आवश्यक आहे. १८ वर्ष पूर्ण केलेल्या सर्व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी फॉर्म क्रमांक ६ भरून आपले नाव मतदार यादीत नोंदवावे असे आवाहन त्यांनी केले.

---

**mo२६५ तालुक्यांच्या यादीत ठाणे-पालघरचा समावेश नाही**

**पीक परिस्थितीचा प्रत्यक्ष आढावा घेऊन शेतकऱ्यांना मदत देण्याची मागणी**

# भिवंडी, वाडा तालुक्यांतही दुष्काळ जाहीर करा; आमदार शांताराम मोरे यांची मुख्यमंत्र्यांकडे मागणी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

ठाणे प्रतिनिधी/मिलिंद जाधव

राज्यातील ३५८ पैकी २६५ तालुक्यांमध्ये दुष्काळ जाहीर करण्यात आला असताना ठाणे व पालघर जिल्ह्यातील एकाही तालुक्याचा पहिल्या यादीत समावेश करण्यात आलेला नाही. या पार्श्वभूमीवर भिवंडी ग्रामीण विधानसभा मतदारसंघातील भिवंडी व पालघर जिल्ह्यातील वाडा तालुक्यातही दुष्काळ जाहीर करून शेतकऱ्यांना शासकीय मदतीचा लाभ द्यावा, अशी मागणी आमदार शांताराम मोरे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे पत्राद्वारे केली आहे. राज्य शासनाने २६ सप्टेंबर रोजी २६५ तालुक्यांमध्ये दुष्काळ जाहीर करून संबंधित भागातील शेतकऱ्यांसाठी विविध सवलती व उपाययोजना लागू केल्या आहेत. मात्र, पहिल्या यादीत ठाणे व पालघर जिल्ह्यातील तालुक्यांचा समावेश नसल्याने या भागातील शेतकऱ्यांच्या अडचणींकडे लक्ष वेधण्याची मागणी आमदार मोरे यांनी केली आहे. ५४ हजार हेक्टर क्षेत्रावर खरीप पिकांची लागवड

मुख्यमंत्र्यांना पाठविलेल्या पत्रात आमदार मोरे यांनी ठाणे-पालघर जिल्ह्यातील शेतीची परिस्थिती मांडली आहे. यंदाच्या खरीप हंगामात या दोन्ही जिल्ह्यांत सुमारे ५४ हजार हेक्टर क्षेत्रावर भात व अन्य पिकांची लागवड करण्यात आली आहे. यामध्ये निमगाव, हळवा तसेच गवाभात यांसारख्या भात वाणांची मोठ्या प्रमाणावर लागवड केली जाते. याशिवाय परिसरात भाजीपाल्याचे उत्पादनही मोठ्या प्रमाणावर घेतले जाते. भात पिकासाठी साधारणपणे ऑगस्ट महिन्याच्या मध्यापर्यंत पुरेसा पाऊस आवश्यक असतो. मात्र, पावसाने ओढ दिल्याने भात पिकांवर प्रतिकूल परिणाम झाला असून अनेक शेतकऱ्यांचे नुकसान झाल्याचे आमदार मोरे यांनी पत्रात नमूद केले आहे. पावसाने लवकरच उघडीप दिल्यामुळे खरीप हंगामाबरोबरच आगामी रब्बी हंगामावरही परिणाम



होण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे. ठाणे-पालघर जिल्ह्यात सुमारे ६ हजार २५० हेक्टर क्षेत्रावर रब्बी पिकांचे नियोजन करण्यात आले होते. मात्र, उपलब्ध पाणीसाठा आणि जमिनीतील ओलावा कमी झाल्यास रब्बी पिकांसाठीही पाणीटंचाई निर्माण होण्याची शक्यता आहे. भिवंडी आणि वाडा तालुक्यांच्या ग्रामीण भागात मोठ्या प्रमाणावर शेतकरी भातशेती व अन्य शेती व्यवसायावर अवलंबून आहेत. त्यामुळे पावसाच्या अनियमिततेचा आणि दीर्घकाळ पडलेल्या खंडाचा थेट परिणाम शेतकऱ्यांच्या उत्पन्नावर होण्याची शक्यता आहे.

दरम्यान, राज्यातील उर्वरित तालुक्यांमध्ये पीक व पाण्याची प्रत्यक्ष परिस्थिती तपासून पुढील निर्णय घेण्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्पष्ट केले आहे. त्यामुळे भिवंडी आणि वाडा तालुक्यांचीही प्रत्यक्ष पाहणी करून येथील दुष्काळसदृश परिस्थितीचा आढावा घ्यावा, अशी मागणी आमदार शांताराम मोरे यांनी केली आहे. भिवंडी व वाडा तालुक्यांचा दुष्काळग्रस्त तालुक्यांमध्ये समावेश करून शेतकऱ्यांना शासनाच्या सवलती व मदतीचा लाभ मिळवून द्यावा, अशी मागणी आमदार शांताराम मोरे यांनी मुख्यमंत्री फडणवीस यांच्याकडे केली आहे. राज्य शासनाच्या पुढील आढाव्यात या दोन्ही तालुक्यांच्या पीक व पाणी परिस्थितीचा विचार होतो का, याकडे शेतकरी वर्गाचे लक्ष लागले आहे.

# प्रेमाच्या कवितांनी अक्कलकोटकरांना घातली मोहिनी !

## गुंजन पाटील यांच्या ‘जाऊ कवितांच्या गावा’तून स्त्रीमन अन नातेसंबंधा वेध

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

तालुका/प्रतिनिधी : कधी प्रेमाची हळुवार स्पंदने, कधी संसारातील गंमतीशीर अनुभव, तर कधी स्त्रीमनातील न बोललेल्या भावनांना शब्दरूप देत प्रसिद्ध कवयित्री गुंजन पाटील यांनी ‘जाऊ कवितांच्या गावा’ या काव्यकार्यक्रमातून रसिकांना कवितांच्या भावविश्वाची अनोखी सफर घडवली. प्रेमकवितांच्या ओघवत्या सादरीकरणाने कार्यक्रमात रंगत आणली.मला आई व्हायचे नाही..., ‘बायको, थोडी साधी...’ यांसारख्या कवितांतून वैवाहिक जीवनातील गंमत, नात्यांमधील गोडवा आणि अपेक्षांचे विविध पैलू उलगडले, तर ‘तुमच्यात काय कला आहे, तुमच्यात कृष्णलीला आहे, मला माहीत आहे,’ अशा ओळींनी रसिकांचे लक्ष वेधून घेतले. साध्या, सहज आणि मिश्कील शब्दांतून मानवी स्वभावाचे दर्शन घडविणाऱ्या त्यांच्या कवितांनी उपस्थितांना कधी हसवले, तर कधी प्रेमाच्या भावविश्वात रमवले.

प्रेम म्हणजे केवळ दोन व्यक्तींमधील आकर्षण नव्हे, तर त्यात दडलेली काळजी, समजूतदारपणा, अपेक्षा आणि भावनिक गुंतवणूकही असते, याची जाणीव गुंजन पाटील यांच्या कवितांतून झाली. स्त्रीमनातील हळवेपणा, कौटुंबिक नात्यांतील गुंतागुंत, संसारातील रोजच्या अनुभवांमधून उमटणाऱ्या भावना आणि तरुणाईच्या प्रेमाविषयीच्या कल्पना त्यांनी आपल्या शब्दांतून प्रभावीपणे मांडल्या. त्यांच्या कवितांमध्ये अनुभवांची सहजता आणि भावनांची तरलता जाणवत होती. दैनंदिन जीवनात सहज घडणाऱ्या प्रसंगांना कवितेचे रूप देत त्यांनी रसिकांना स्वतःच्या आयुष्यातील अनुभवांशी जोडून घेतले. त्यामुळे या कार्यक्रमाला केवळ काव्यवाचनाचे स्वरूप न राहता, प्रेम, नाती आणि भावनांचा वेध घेणारा संवादात्मक अनुभव लाभला. शब्दांमधील मिश्कीलपणा आणि भावनांमधील प्रामाणिकपणा यांचा सुरेख मेळ त्यांच्या सादरीकरणातून अनुभवायला मिळाला.प्रारंभी पत्रकार मारुती बावडे,प्रशांत भगरे, अरविंद पाटील,शिवा याळवार यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून कार्यक्रमाचे उद्घाटन करण्यात आले.

या कार्यक्रमाला आमदार सचिन कल्याणशेट्टी,नगराध्यक्ष मिलन कल्याणशेट्टी,अविनाश महागावकर,रेणुका महागावकर, डॉ. शिवराया आडवीतोटे,निलकंठ कापसे, राजू हिप्परगी, निनाद शहा, अतुल कोकाटे, प्रमोद लोकापुरे, प्रकाश घिवारे आदी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन खंडेराव घाटगे यांनी केले.

### कवितांमधून उलगडले नात्यांचे रंग

**कविता ही केवळ शब्दांची रचना नसून ती माणसाच्या मनातील न बोललेल्या भावनांना अभिव्यक्त करणारी कला आहे, याचा प्रत्यय गुंजन पाटील यांच्या सादरीकरणातून आला. प्रेम, संसार, स्त्रीमन आणि तरुणाईच्या भावविश्वाला स्पर्श करणाऱ्या या काव्यमैफलीने उपस्थित रसिकांना साहित्यिक आनंदाची अनुभूती दिली. ‘जाऊ कवितांच्या गावा’ या शीर्षकाला साजेशा भावपूर्ण वातावरणात रंगलेल्या या कार्यक्रमातून अक्कलकोटकरांना कवितांच्या माध्यमातून नात्यांचे विविध रंग अनुभवता आले.**





# कर्मयोगी इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसीमध्ये जागतिक फार्मासिस्ट दिन उत्साहात साजरा



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : कर्मवीर इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी शेळवे तालुका पंढरपूर येथे जागतिक फार्मासिस्ट दिनांक एक २०२६ उत्साह पूर्ण वातावरणात सादर करण्यात आला या वर्षीची शाश्रिळपस हिरीर-लशींीळली षी िंहश शश्रवशीि षींीहशी हे संकल्पना केंद्रस्थानी ठेवून विविध उपक्रमाचे आयोजन करण्यात आले कार्यक्रमाचे आयन दोन १७ मध्ये करण्यात आले या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे व अध्यक्ष म्हणून प्राध्यापक डॉक्टर नाझिया तांबोळी उपस्थित होते.

पाहुण्यांची ओळख करून देऊन औपचारिक कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. प्रमुख पाहुण्याची ओळख प्राध्यापक सुभाष चौगुले यांनी करून दिली व यावेळी प्राध्यापक प्राध्यापक नजमा शेख यांनी प्राध्यापक डॉक्टर नदिया तांबोळी यांचा शाल व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला त्यानंतर प्राध्यापक डॉक्टर नझिया तांबोळी यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शनपर व्याख्यान दिले व त्यांनी फार्मासिटीचे आरोग्य सेवेतील भूमिका औषधांचा योग्य वापर रोगणसेवेतील फार्मा योगदान तसेच भविष्यातील फर्मासी क्षेत्रातील संधी याविषयी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले व प्राध्यापक डॉक्टर तांबोळी यांनी विद्यार्थ्यांचा मधुमेह व त्याचे औषध उपचार व्यवस्थापन व या विषयावर संघटित मार्गदर्शन केले व त्यांनी जागतिक फार्मासिस्ट दिनाचा इतिहास फार्मसीची आरोग्य देवतेतील महत्त्वपूर्ण भूमिका तसेच फार्मसीच्या विविध जबाबदाऱ्या याबाबत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले व त्यांनी औषधाच्या सुरक्षित व योग्य वापरांमध्ये फार्मासिटीचे योगदान रुग्णसेवेतील त्यांची भूमिका आणि समाजाच्या आरोग्यासाठी जनजागृती या फार्मासिटीच्या विषयावर योग्य ती माहिती दिली. पोस्टर सादरीकरण या विजेते विद्यार्थ्यांना एवढी पारितोषिक वितरण व समारंभाच्या वेळी प्रमाणपत्राद्वारे प्रमाणपत्र देऊन सन्मान चिन्ह देऊन त्यांचा गौरव करण्यात आला. प्रथम क्रमांकाचे कुमारी समृद्धी खरात आणि कुमारी स्नेहा आदलिंगे यांना मिळाली द्वितीय क्रमांकाचे पारितोषिक विभागून देण्यात आले डी फार्म द्वितीय वर्षातील कुमारी सणाकाजी आणि कुमारी सोनोबर इनामदार तसेच डी फार्म द्वितीय वर्षातील कुमारी प्रियंका पताळे आणि कुमारी शंभुराजे सावंत यांनी द्वितीय क्रमांकाचे पारितोषिक मिळवली विजेत्या विद्यार्थ्यांचे श्री पांडुरंग प्रतिष्ठानचे विश्वस्त श्री रोहन परिचारक उपस्थित मान्यवर शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी तसेच विद्यार्थ्यांची अभिनंदन केले व कार्यक्रमाचे सांगता प्राध्यापक अक्षय भिंती यांच्या आभार प्रदर्शन आणि झाली व पोस्टर सादरीकरणाची समन्वयक म्हणून प्राध्यापक आकाश राऊत यांनी काम पाहिले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व समन्वय प्राध्यापक विशाल वाघमारे यांनी केली व कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी महाविद्यालयातील शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थ्यांनी सहकार्य केले.

# कल्याणशेट्टी महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाची स्वच्छता रॅली

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट : स्वच्छ भारत सुंदर भारत, प्लास्टिकचा वापर करू नका, कचरा रस्त्यावर टाकू नका, सार्वजनिक ठिकाणी घाण करू नका, घरात छतावर पाणी साचू देऊ नका, कचरा पेटीत कचरा टाका अशा घोषणा देत कल्याणशेट्टी महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागातील स्वयंसेवकांनी स्वच्छता रॅली काढली.

महात्मा गांधींच्या स्वच्छतेच्या विचारांना प्रत्यक्ष कृतीची जोड देण्यासाठी कल्याणशेट्टी महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाने ही स्वच्छता रॅली आयोजित केली होती.

महाविद्यालय ते हन्नूर चौक, एसटी स्टँड, कारंजा चौक, बाजारपेठ मार्गे श्री स्वामी समर्थ मंदिरापर्यंत स्वच्छता रॅली काढण्यात आली. ठीक ठिकाणी विद्यार्थ्यांनी नागरिकांना प्रबोधन केले.

विद्यार्थ्यांनी परिसरातील कचरा प्लास्टिक व घनकचरा गोळा करून तो कचरापेटीत टाकला, रॅलीचे नियोजन एनएसएस कार्यक्रमाधिकारी प्राध्यापिका डॉ शितल झिंगाडे भस्मे यांनी केले. प्राध्यापक सौरभ भस्मे डॉ बाळासाहेब पाटील, प्राध्यापिका प्राची गणेचारी, सौंदर्या शास्त्री, विद्याश्री बिराजदार, ऐश्वर्या तारापुरे, जनाबाई चौधरी रॅलीमध्ये सहभागी झाले होते.

संस्थेचे अध्यक्ष विद्यमान आमदार सचिनदादा कल्याणशेट्टी, संचालिका शांभवीताई कल्याणशेट्टी, जेष्ठ संचालक मल्लिनाथ कल्याणशेट्टी, सचिवमल्लिकार्जुन मसुती, प्राचार्य डॉ राजेंद्रसिंह लोखंडे, पुनम काकळगी, रूपाली शहा, मुख्याध्यापक मलकप्पा भरमशेट्टी यांनी उपक्रमाबद्दल एन एस एस स्वयंसेवकाचे अभिनंदन केले.

विद्यार्थ्यांच्या लक्षवेधी घोषणा रस्त्यावर कचरा टाकू नका, ओला व सुका कचरा वेगळा करा, सार्वजनिक ठिकाणी थुंकू नये, प्लास्टिकचा अनावश्यक वापर करू नका अशा लक्षवेधी घोषणा विद्यार्थ्यांनी दिल्या, त्यामुळे संपूर्ण परिसर दुमदुमून गेला होता, नागरिकांनी देखील विद्यार्थ्यांचे कौतुक केले.



# सत्याचरण व सदाचरण हिच गांधीजी व शास्त्रीजींना खरी आदरांजली



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर/प्रतिनिधी : गांधींनी देशाला स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी सत्य,सत्याग्रह, अहिंसा, सविनय कायदेभंग, निरोधन या अभिनव मार्गाचा अवलंब केला. त्यांच्या हाकेला प्रतिसाद देऊन लाल बहादूर शास्त्रीजी या लढ्यात भाग घेतला. गांधीजींची शिकवण आत्मसात करून पंतप्रधान झाल्यावर ही निर्लोभी, निस्वार्थी, निरपेक्ष तत्त्वनिष्ठ व निष्कलंक चारित्र्याचा आदर्श ठेवला. गांधींनी व शास्त्रीजींनी स्वहितापेक्षा देश हिताला प्राधान्य दिले. देशासाठी फकीरी पत्करली म्हणून प्रत्येक भारतीयांनी, त्यांनी सांगितलेले तत्वज्ञान समजून घ्यावे. सत्याचरण व सदाचरण ठेवल्यास देशाची प्रगती होईल असे प्रतिपादन हिराचंद नेमचंद वाचनालयाचे अध्यक्ष प्रा. डॉ. श्रीकांत येळेगावकर यांनी केले.

ते म. गांधी व शास्त्री जयंतीच्या पूर्वसंध्येला लोकोत्तर नेते म. गांधीजी व शास्त्रीजी या विषयावर कस्तुरबाई कॉलेज ऑफ एज्युकेशन मध्ये बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. अश्विन बोंदार्डे हे होते.

हा कार्यक्रम कस्तुरबाई कॉलेज ऑफ एज्युकेशन सोलापूर, सोलापूर जिल्हा सामाजिक कार्य समिती व फॅमिली असोसिएशन ऑफ इंडिया, सोलापूर शाखा यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आला होता.

यावेळी मंचावर सोलापूर जिल्हा सामाजिक कार्य समितीचे अध्यक्ष उल्हास पाटील, एफ.पी.ए.आय. सोलापूर शाखेच्या फायनान्स डव्हायझर डॉ. आयेशा रंगरेज, शाखाधिकारी सुगतरत्न गायकवाड, प्रा. डॉ. दत्ता वाघमारे, डॉ. विद्या भोसले, डॉ. गीता मासाळ, प्रा. सचिन हेडे, डॉ. साहेबगोडा पाटील, सुवर्णा गाडेकर, संतोष गायकवाड, सपना चिलवेरी, चंद्रकांत झळके इत्यादी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी विद्यार्थ्यांनी बनविलेल्या लालबहादूर शास्त्री व महात्मा गांधी यांच्या जीवनावरील पोस्टरचे मान्यवरांच्या हस्ते विमोचन करण्यात आले.

अध्यक्षीय समारोपात प्राचार्य डॉ. अश्विन बोंदार्डे यांनी गांधीजींनी सांगितलेली त्याग, प्रामाणिकपणा, अहिंसा, साधेपणा ही मूल्ये आत्मसात करण्याचे आवाहन केले.

कार्यक्रमास कस्तुरबाई कॉलेज ऑफ एज्युकेशनचे विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते तर सोलापूर जिल्हा सामाजिक कार्य समिती मायक्रोन व ट्रकर्स प्रकल्प, निरामय आरोग्य धाम व सखी वन स्टॉप सेंटरचे अधिकारी व पदाधिकारी उपस्थित होते.

कार्यक्रमाचे स्वागत व प्रास्ताविक पंचम देशपांडे यांनी केले. सूत्रसंचालन लक्ष्मी हिंगणगावकर यांनी केले तर आभार अश्विनी साबळे यांनी केले.

### आगरी, कोळी, कुणबी व बारा बलुतेदार समाजातील ३९ हून अधिक संघटना एकत्र

# भूमिपुत्रांच्या प्रश्नांसाठी सागरी भूमिपुत्र महासंघाची स्थापना : शरद पवार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

ठाणे प्रतिनिधी/मिलिंद जाधव : आगरी, कोळी, कुणबी तसेच बारा बलुतेदार समाजातील विविध घटकांना एकत्र आणत ठाणे, रायगड, पालघर, मुंबई आणि मुंबई उपनगर या पाच जिल्ह्यांतील ३९ हून अधिक सामाजिक संघटनांच्या सहभागातून ‘सागरी भूमिपुत्र महासंघा’ची स्थापना करण्यात आली. स्थानिक भूमिपुत्र आणि प्रकल्पग्रस्तांच्या विविध प्रश्नांना या महासंघाच्या माध्यमातून संघटितपणे वाचा फोडता येईल, असा विश्वास राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांनी व्यक्त केला.

ठाणे येथील गडकरी रंगायतन येथे मंगळवारी महासंघाच्या उद्घाटनाचा कार्यक्रम झाला. यावेळी शरद पवार यांनी व्हिडीओ कॉन्फरन्सद्वारे उपस्थितांशी संवाद साधला. खासदार बाळ्या मामा यांच्या नेतृत्वाखाली महासंघाची स्थापना करण्यात आली आहे.

स्थानिक भूमिपुत्रांच्या हक्कांसाठी लोकनेते दि. बा. पाटील यांनी सातत्याने संघर्ष केला. त्याच विचारांचा वारसा पुढे नेत बाळ्या मामा यांनी भूमिपुत्रांना एका व्यासपीठावर आणण्याचे काम केले आहे. स्थानिक आणि प्रकल्पग्रस्तांच्या प्रश्नांसाठी सर्वांनी महासंघाच्या पाठीशी उभे राहावे, असे आवाहन शरद पवार यांनी केले.

बालयोगी सदानंद महाराज यांच्या हस्ते महासंघाची स्थापना करण्यात आली. यावेळी महासंघाच्या लोगोचे अनावरणही मान्यवरांच्या उपस्थितीत करण्यात आले. कार्यक्रमाला आर. सी. पाटील, मनसेचे प्रदेश उपाध्यक्ष डी. के. म्हात्रे, उरणच्या नगराध्यक्षा भावना घाणेकर, माजी जिल्हा परिषद सदस्य शारदा म्हात्रे, राष्ट्रवादी काँग्रेसच्या महिला जिल्हाध्यक्षा डॉ. रुपाली कराळे, गायक जगदीश पाटील, समाजसेविका रश्मीता पोपाटा यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित होते.

नवी मुंबई विमानतळाला लोकनेते दि. बा. पाटील यांचे नाव देणे, हा महासंघाच्या प्रमुख मागण्यांपैकी एक आहे. विकास प्रकल्पांमुळे स्थानिकांच्या जमिनी, गावठाणे, कोळीवाडे, रोजगार आणि पारंपरिक व्यवसायांवर परिणाम होत असल्याचे महासंघाच्या वतीने सांगण्यात आले.

पद्मश्री लक्ष्मण माने यांनीही नवी मुंबई विमानतळाला दि. बा. पाटील यांचे नाव देण्याच्या मागणीला पाठिंबा देत ओबीसी समाजातील मायक्रो ओबीसी घटकांच्या प्रश्नांकडे लक्ष वेधले.

यावेळी खासदार बाळ्या मामा यांनी प्रकल्पग्रस्तांच्या प्रश्नांवर आक्रमक भूमिका मांडली. आम्ही प्रकल्पग्रस्त का? आम्ही प्रकल्पमालक का नाही? असा सवाल त्यांनी उपस्थित केला. प्रकल्पांसाठी जमिनी घेताना शेतकऱ्यांना योग्य मोबदला मिळत नसल्याचा आरोप त्यांनी केला.

नवी मुंबई विमानतळावर स्थानिकांना किती रोजगार उपलब्ध झाला, याची माहिती घेऊन महिनाभरात आंदोलन करण्यात येईल, असा इशाराही बाळ्या मामा यांनी दिला. गावठाण विस्तार, कोळीवाडे, विरार-अलिबाग प्रकल्प, शेतजमिनीवरील आरक्षण, वाळू व्यवसाय आणि स्थानिक रोजगार यांसारख्या विषयांवर महासंघाच्या माध्यमातून पाठपुरावा करण्यात येणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. शेतकऱ्यांवर अन्याय झाल्यास महासंघ त्यांच्या पाठीशी ठामपणे उभा राहील, असेही त्यांनी सांगितले.

कार्यक्रमादरम्यान पद्मश्री लक्ष्मण माने यांचा सन्मान करण्यात आला. तसेच पद्मश्री भिकल्या धिंडा यांना ‘सागरी रत्न भूमिपुत्र’ पुरस्काराने गौरविण्यात आले. बाळ्या मामा यांच्या वतीने भिकल्या धिंडा यांना ३ लाख ३३ हजार ३३३ रुपयांचा धनादेश प्रदान करण्यात आला. यावेळी भिकल्या धिंडा यांनी सादर केलेल्या तारपा वादनाने कार्यक्रमात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले.

# ‘स्वच्छता ही सेवा’ अभियानांतर्गत डोहोळे ग्रामपंचायतीत स्वच्छता मोहीम



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

ठाणे प्रतिनिधी/मिलिंद जाधव : भिवंडी तालुक्यातील ग्रुप ग्रामपंचायत डोहोळे येथे ‘स्वच्छता ही सेवा’ अभियानांतर्गत ‘एक दिवस, एक तास, एक साथ’ हा विशेष स्वच्छता उपक्रम उत्साहात राबविण्यात आला. ग्रामपंचायत कार्यालय तसेच लगतच्या परिसरात व्यापक स्वच्छता मोहीम राबवून स्वच्छतेचा संदेश देण्यात आला.

या उपक्रमावेळी भिवंडी पंचायत समितीचे सहाय्यक गट विकास अधिकारी सुदाम इंगळे यांच्या हस्ते परिसर स्वच्छ ठेवण्यासाठी महत्त्वाची भूमिका बजावणाऱ्या सफाई कर्मचाऱ्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी ग्रामपंचायत अधिकारी परेश सोनावणे यांच्यासह ग्रामपंचायत कर्मचारी व पदाधिकारी उपस्थित होते. सफाई कर्मचाऱ्यांच्या आरोग्य व सुरक्षेच्या दृष्टीने त्यांना काम करताना आवश्यक असणाऱ्या टोपी, हॅन्डग्लोज, मास्क आणि जॅकेट या सुरक्षासाहित्याचे वाटप करण्यात आले. स्वच्छ परिसर राखण्यासाठी सफाई कर्मचाऱ्यांचे योगदान महत्त्वाचे असून, त्यांच्या सुरक्षिततेची काळजी घेणे हीदेखील सर्वांची जबाबदारी असल्याचे यावेळी अधोरेखित करण्यात आले. या स्वच्छता अभियानामुळे ग्रामपंचायत परिसर स्वच्छ व सुंदर करण्यासोबतच नागरिकांमध्ये स्वच्छतेबाबत जनजागृती करण्याचा संदेश देण्यात आला.